# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

क्र.सामान्य/कक्ष-१/टे-१/आस्था/सी.आर.२३/२०१६, दिनांक :- ०९/०६/२०१६

जाहीर प्रकटन

महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम (MDRM) जिल्हा ठाणे.

महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम (MDRM) साठी जिल्हयात खालील पद करार (कंत्राटी) पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात भरावयाचे आहे. त्याकरीता खाली विहित करण्यात आलेली पात्रता पूर्ण करणा-या उमेदवारांनी मुलाखतीसाठी दिनांक २४/०६/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता समिती सभागृह, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे ४०० ६०१ येथे उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पद | एकत्रित मानधन (दरमहा) | शैक्षणिक अर्हता व अनुभव | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| १. | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी | रु.३०,०००/- ठोक वेतन या व्यतिरीक्त कोणतेही देय होणार नाही. | मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी / पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन)<br>१) आपत्ती व्यवस्थापनातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>२. मराठी व इंग्रजी भाषांचे चांगले ज्ञान असणे इष्ट.<br>३. टिप्पणी लेखन, अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य.<br>४. शासकीय कामाच्या अनुभवास विशेष प्राधान्य देण्यात येईल. | १ |

सर्व साधारण अटी व शर्ती :-

१) सदरची नेमणूक ही करार (कंत्राटी) पध्दतीने असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, ठाणे या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसेल.

३) वरील पदावर निवड झालेल्या उमेदवारांकडून नेमणूक देणेपुर्वी रु.१००/- (अक्षरी रु.शंभर फक्त.) चे स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यात करारपत्र घेणेत येईल.

४) करार पध्दतीने नेमणूक करावयाचे असल्याने ठोक वेतनाशिवाय अन्य कोणतेही आर्थिक लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

५) कोणत्याही प्रकारची पुर्व सूचना न देता पदावरुन कमी करण्यात येईल.

६) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

७) मुलाखतीस येताना मुळ कागदपत्रे आणणे आवश्यक आहे.

८) सदर पदासाठी उमेदवाराने आपले पुर्ण नांव, टपालाचा पुर्ण पत्ता पिनकोडसह, मोबाईल / दुरध्वनी क्र., ई मेल आयडी, जन्मतारीख, डोमिसाईल प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता व अनुभव विषयक माहिती (Bio Data) समाविष्ट असेल अशाप्रकारे अर्ज जिल्हाधिकारी ठाणे यांचे नांवे सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत वय, शैक्षणिक अर्हता, जातीचा दाखला व अनुभव याबाबतच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन सादर करावेत.

९) उमेदवाराने अर्जावर आपला सक्षम अधिका-याने साक्षांकित केलेला फोटो चिकटविणे आवश्यक आहे. असा अर्ज दिनांक १७/०६/२०१६ पर्यत कार्यालयीन वेळेत आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे दाखल करावा. अर्जाचा नमुना जिल्हयाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

१०) प्राप्त अर्जांची छाननी करुन मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी दिनांक २१/०६/२०१६ रोजी सूचना फलकावर अथवा वेबसाईटवर (www.thane.nic.in) प्रसिध्द केली जाईल. पात्र उमेदवारांच्या यादीवर कोणाची हरकत असल्यास २३/ ०६/२०१६ पर्यत कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करता येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

११) पात्र उमेदवारांची मुलाखात दिनांक २४/०६/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून घेतली जाईल. वर निश्चित करुन दिलेले दिवशी उपस्थित न राहिलेल्या उमेदवारांची तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही.

१२) उमेदवारांनी मौखिक परिक्षेसाठी स्वखर्चाने हजर रहावे.

१३) एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षपणे दबाब आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१४) जिल्हाधिकारी यांनी कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न दर्शविता रदद करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.

स्वाक्षरी/-
(डॉ.महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी ठाणे.

निर्गमित केले.

जिल्हाधिकारी ठाणे करीता.

## कंत्राटी पध्दतीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदाकरीता अर्ज.
### जिल्हा ठाणे.

जाहीरात क्र.सामान्य/कक्ष-१/टे-१/आस्था/सी.आर.-२३/२०१६, दिनांक ०९/०६/२०१६

प्रति,

मा.जिल्हाधिकारी, ठाणे.

(आस्थापना शाखा)

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव. :- ....................
(प्रथम आडनांव, स्वत:चे नांव व वडील/पतीचे नांव)

२. पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता. (पिनकोडसह) :- ....................
:- ....................
:- ....................
:- ....................

३. दुरध्वनी / भ्रमणध्वनी. :- ....................

४. ई-मेल आयडी :- ....................

५. जन्म तारीख. :- ....................

६. जन्म ठिकाण. :- ....................

७. लिंग. :- ....................

८. जात प्रवर्ग :- ....................

९. संगणकीय अर्हता. :- ....................

१०. महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहात काय ? :- ....................
(असल्यास डोमिसाईल प्रमाणपत्र जोडावे.)

११. ज्ञात असलेल्या भाषा. :- ....................
:- ....................
:- ....................

१२. फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल असल्यास :- ....................
त्याबाबतचा तपशिल व सद्यस्थिती. :- ....................

१३. शैक्षणिक अर्हता. :- ....................

मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी / पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन)

| परिक्षेचे नांव | बोर्ड / विद्यापिठाचे नांव | घेतलेले विषय | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१४.अनुभव. (आपत्ती व्यवस्थापनातील कामाचा अनुभव.) :- ....................

| अ.क्र. | पदनाम | संस्थेचे नांव | ठिकाण | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |

१५. मराठी व इंग्रजी भाषांचे चांगले ज्ञान असल्याचा अनुभव. :- ....................

:- ....................

:- ....................

१६. टिप्पणी लेखन, अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य. :- ....................

:- ....................

:- ....................

१७. शासकीय कामाचा अनुभव. :- ....................

| अ.क्र. | शासकीय / निमशासकीय कार्यालयाचे नांव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| | | | |
| | | | |
| | | | |

जाहीरातीत नमूद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून, या अटी व शर्तींचा भंग केल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यामध्ये माझी उमेदवारी रद्द होईल याची मी समज घेतली आहे. अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी व बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव माझ्यापाशी आहे. मी आणखी असे प्रमाणित करतो की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास, खोटया माहितीच्या आधारे मिळालेली उमेदवारी किंवा निवड / नियुक्ती रद्द होण्यास व कायदेशीर कारवाईस मी पात्र ठरेन. त्याबददल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

आपला विश्वासु

ठिकाण :-

(अर्जदाराचे नांव व सही)

दिनांक :-